# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE (ECHO GROUP)

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. Shashi Tiwari

VOL: XXIV | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, JULY 2022 | No. 06


## पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

नीतिसूत्रे ३०:१-१०

१. हे परमेश्वरा, मी तुझी थोरवी गाईन, कारण तूं मला उद्धरिलें आहे; तूं माझ्या वैऱ्यांस मजवर हर्षू दिले नाही.

२. हे परमेश्वरा, माझ्या देवा, मी तुझा धांवा केला आणि तूं मला रोगमुक्त केले.

३. हे परमेश्वरा, तूं माझा जीव अधोलोकांतून वर काढिला; तूं मला जिवंत राखिलें, मला गर्तेत पडूं दिले नाही.

४. अहो परमेश्वराचे भक्तहो, याचे गुणगान गा; आणि त्याच्या पवित्र नामाचे स्मरण करिताना धन्यवाद करा.

५. त्याचा क्रोध क्षणमात्र राहतो; त्याचा प्रसाद आयुष्यभर राहतो; रात्रौ विलापाने बिऱ्हाड केले तरी प्रात:काळी हर्षध्वनि होतो.

६. मी तर आपल्या संपत्काली म्हटले, मी कधी ढळणार नाही.

७. हे परमेश्वरा, तूं प्रसन्न होऊन माझा पर्वत खंबीर केला; तूं आपले मुख लपविले तोच मी भयभीत झालो.

८. हे परमेश्वरा, मी तुझा धांवा केला; परमेश्वराची विनवणी करून मी म्हणालो.

९. माझा रक्तपात झाल्यानें, मी गर्तेत पडल्यानें काय लाभ? माती तुझी स्तुति करील काय? मी तुझें सत्यविदित करील काय?

१०. हे परमेश्वरा, ऐक, मजवर दया कर; हे परमेश्वरा; माझें साहाय्य कर.

# तुमचा निर्णय तुमचे अंतिम स्थान ठरवितो

## YOUR DECISION DETERMINES YOUR DESTINY!

(पास्टर एस्. सॅम. सेल्वाराज)

**या जगातील सर्वांनाच त्यांच्याकरिता चांगल्या गोष्टी घडाव्यात असे वाटत असते - अनपेक्षित किंवा अपेक्षित आशीर्वाद! बढती!! परंतु प्रत्येकाला देवाकडून असामान्य असे पाचारण असते; आणि तो आपल्या प्रत्येकाला वेगवेगळ्या मार्गांनी चालिवतो. आपले पाचारण कदाचीत वेगळे असेल - परंतु आपण योग्यवेळी घेतलेला निर्णय आपले अंतिमस्थान निश्चित करतो. अनेक लोकांच्या जीवनाचा आभ्यास करतो, तेव्हा हे सत्य आपल्याला प्रगट होते. एलीया संदेष्ट्याच्या, अलीशा आणि अलीशाचा मदतनीस गेहजी यांच्या जीवनाचा आभ्यास करु या. हे सर्व जण समकालिन होते.**

### I एलिया संदेष्टा :


एलिया ख्रि.पू. ९१०-८९६ या काळात जीवंत होता. एलीया तिश्बी हा गिलाद येथे उपरी म्हणून राहण्याऱ्यापैकी एक होता. त्याला पूर्वनियोजीत असा देवाचा संदेष्टा होण्याकरिता देवाचे पाचारण होते. बायबल त्याच्या जन्माविषयी किंवा कुटुंबाविषयी कोणतीहि माहिती देत नाहि.

''एलीया'' या नावाचा अर्थ ''यहोवा माझा देव आहे'' असा आहे. एलीयाच्या संपुर्ण जीवनाकडे आपण पाहातो तेव्हा आपल्याला लक्षात येते की, देवानेच त्याला पाचारण केले, आणि शेवटी देवच त्याला स्वर्गात घेऊन गेला. त्याने मृत्युचा अनुभव घेतला नाहि. त्याचा दफनविधी (प्रेत क्रिया) करण्यात आला नाही. आणि पृथ्वीवर असताना सन्यासासारखा राहात होता, प्राण्याच्या केसांचे बनविलेले वस्त्र घालीत असे आणि कमरेस कमरबंध बांधीत असे.

देवाने या जंगलात राहात असलेल्या पवित्र जीवन जगत असलेल्या मनुष्याला पाहिले, आणि आपली अद्भूत योजना अमलात आणण्याकरिता त्याला निवडीले. देवाची निवड माणसाच्या शैक्षणिक पात्रतेवर किंवा त्याच्या आर्थिक किंवा कौटुंबिक पार्श्वभूमि अशा पायावर नव्हती. एलीयाची पात्रता ही केवळ तो नेहमीच देवाची वाणी ऐकण्यास आणि देव सांगत असे ते करण्यास तयार होता, ही होती. आणि देवाने त्याला आहाब आणि आहाज्या राजांच्या कारकीर्दीत संदेष्टा केले. एलीच्या दिवसात पुत्र अम्रीचा पुत्र आहाब इस्त्राएलावर राज्य करू लागला, त्याने परमेश्वराच्या दृष्टिने जे वाईट ते आपल्यापूर्वी होऊन गेलेल्या सर्वांपेक्षा अधिक वाईट वर्तन

(...पान ३ वर)

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



(ECHO GROUP)

## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

''परमेश्वर कृपाळू व कन्हवाळू आहे;
तो मंदक्रोध व अतिदयाळू आहे''
- स्तोत्र १४५:८



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


**CHIEF EDITOR**

Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

**MANAGING EDITOR**

Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**ADMINISTRATION**

Bro. N. Prakasam, M.A., General Manager

**EDITORIAL BOARD**

Sis. Jesy Veena Sam
Bro. M. Paulraj, M.A., B.Ed.
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.

**EDITOR, PUBLISHER & PRINTER**

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.

Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

**E.mail ID**

sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**

www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

**YOUTUBE CHANNEL**

Echo of His Call


अति प्रिय बंधुंनो आणि बहिणींनो,

आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या धन्य नामात शुभेच्छा.

आमच्या सेवाकार्याच्या प्रति आणि सेवकांच्या प्रति तुम्हाला असलेल्या प्रेमाबद्दल आणि काळजीबद्दल आम्ही तुम्हा सर्वांचे आभारी आहोत.

तुमच्या प्रेमळ दयाळूपणा द्वारा आम्हाला उत्तेजन प्राप्त होत आहे. देव तुम्हाला आशीर्वाद देवो.

नहेम्या बायबल कॉलेजचे अध्यक्ष पास्टर एम्. मुथ्थु यांच्या प्रकृतित सुधारणा होत आहे. त्यांच्या करीता प्रार्थना करीत असलेल्या आमच्या सर्व मित्रांचे आम्ही आभार मानित आहोत. कृपया प्रार्थना करीत राहा.

तुम्हा सर्वांना याची कल्पना आहेच, की आम्ही '**एको ऑफ हिज कॉल** मासिकांच्या, हिन्दी/उडीया आणि तामिळ भाषिक ''**नहेम्या बायबल कॉलेज, सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल**'' इत्यादीच्या वाढीकरिता अतिशय व्यस्त आहोत. देव आमच्या चेन्नईमधील आणि चेन्नईच्या बाहेरील सर्व कार्यक्रम आणि प्रवास आशीर्वादीत करीत आहे. या महिन्यात आम्ही व्यस्त असल्यामुळे ''खड्यातून महालापर्यंत मालीका'' पुढील अंकात सुरू ठेवणार आहोत.

आपले इंग्रजी मासिकाचे सहसंपादक आपले मित्र **बंधु एम्. एम्. पॉलराज** यांनी जीवित यात्रा संपवून २५ मे २०२२ रोजी गौरवात प्रवेश केला. त्यांच्या कुटुंबियांची प्रार्थनेत आठवण ठेवा ते आजारी असताना त्यांच्या साठी प्रार्थना केल्याबद्दल आम्ही तुमचे आभार मानीत आहोत.

देवाच्या कृपेद्वारे ३ जून २०२२ रोजी आमच्या **नहेम्या बायबल कॉलेजची २३वी दिक्षांत उपासना** संपन्न झाली. एकूण २३ विद्यार्थीनी पदवी संपादन केली व त्यांना भारतातील शुभवर्तमान न पोहचेल्या भागांमध्ये सुवार्ता कार्य करण्यासाठी पाठविण्यात आले.

देवाच्या कृपेद्वारे आमचे नहेम्या कॉलेज (सायंकालीन तामिळ भाषिक आणि हिन्दी/उडीया भाषिक निवासी अभ्यासक्रम) ६ जून २०२२ रोजी पुन: सुरू झाले. सर्व वर्ग उत्तम प्रकारे सुरू आहेत. तद्वतच १३ जून रोजी आमची **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** देखील सुरू झाली. या शैक्षणीक संस्थांच्या सुयशा करीता कृपया प्रार्थना करा.

सध्या आमच्या सहकार्यांच्या कुटुंबातील काहिंना देवाने त्यांच्या शरिराला स्पर्श करण्याची गरज वाटत असल्यामुळे, त्यांच्या कुटुंबियांकरिता तुमच्या वाढीव प्रार्थनाची अपेक्षा करीत आहोत.

देव राज्याच्या वाढिकरीता आमच्या विविध सेवाकार्यांच्या सर्व गरजांकरिता प्रार्थना करीत रहा.

येणाऱ्या दिवसात देव तुम्हाला विपुल आशीर्वाद देवो.

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**

(+91) 98412 71858 / 98410 71858, E.mail : samselvaraj333@gmail.com

(पान १ वरुन)

केले. नबाटाचा पुत्र यराबाम याच्या पापकर्माचे अनुकरण करणे ही क्षुल्लक गोष्ट आहे असे त्याला वाटले. त्याने सोदोमाचा राजा एथबाल याची कन्या ईजबेल हिजशी लग्न केले आणि तो बालमूर्तींची सेवा व पुजा करू लागला. त्याने बालाचें एक भवन शोमरोन येथे बांधिले व त्यांत बालाप्रीत्यर्थ एक वेदी बांधिली. (१ राजे १६:३०-३२). एक इस्राएली राजा याने स्वर्ग आणि पृथ्वीच्या देवाची उपासना करण्या ऐवजी तो खोट्या देवाची उपासना करू लागला.

### १) एलीया म्हणाला पर्जन्य पडणार नाहि आणि पर्जन्य पडले नाही :

एलीया देवाचे वचन आहाब राजाकडे घेऊन गेला; आणि त्याला म्हणाला, ''जी वर्षे आता येणार त्यांत दहिंवर अथवा पर्जन्य पडणार नाही; हे सर्व माझ्या सांगण्याप्रमाणे होणार''. तो बोलल्याप्रमाणे साडेतीन वर्षे पर्जन्य पडले नाही. परमेश्वराने त्याला जे सांगितले ते राजापुढे जाऊन त्याला सांगण्याची भीति त्याला वाटली नाहि.

एलीया हा पवित्र आणि देवभक्त असा होता. त्याचा देवावर दृढ विश्वास होता. तो धैर्यवान आणि परिस्थितीच्या परिणामांना न भीणारा होता.

### २) तो आज्ञाधारक संदेष्टा होता :

देवाने एलीयास म्हटले, ''**येथून पूर्व दिशेस जा, व यार्देनेसमोरच्या करींथ ओहळानजीक लपून राहा...**'' (१ राजे १७:३). देवाने सांगितल्याप्रमाणे तो राजाकडे गेला देवाने त्याला वचन दिल्याप्रमाणे, कावळे त्यास भाकरी व मांस सकालसंध्याकाळ आणून देत. त्या देशात पर्जन्यवृष्टि न झाल्यामुळे काही देवसांनी ओहळ आटून गेला. तेव्हा देव त्याला म्हणाला, ''**चल, सीदोनातील सारफथ नगरात जाऊन राहा, पाहा, तुझे पोषण करण्याची तेथल्या एका विधवेस मी आज्ञा केली आहे.**'' एलीयाने या आज्ञेचे देखील पालन केले. त्या विधवेला तो भेटला आणि तिला भाकर व पाणी मागीतले. जरी तिजकडे थोडेसे होते, तरी त्याने मागितल्याप्रमाणे तीने त्याला दिले. त्यामुळे तिला विपुल असा आशीर्वाद प्राप्त झाला. पर्जन्यवृष्टि होईपर्यंत तिचा व तिचे कुटुंब यांचा पुष्कळ दिवस निर्वाह झाला. यानंतर जेव्हा तिचा मुलगा मृत्यु पावला एलीयोंने त्याला पूर्ववत जीवंत केले.

### ३) तो धैर्यवान/धीट असा संदेष्टा होता (१ राजे १८:१८-३९) :

देवाने एलीयास तो आहाबाच्या दृष्टिस पडावा म्हणून पाठविले. एलीयोंने आहाबास सांगितले, ''आता जासूद पाठीव आणि सर्व इस्राएलास, बालमूर्तीच्या साडेचारशे संदेष्टांस आणि ईजबेलीच्या पंक्तिस जेवणाऱ्या आशेरा मूर्तीच्या चारशे संदेष्ट्यांस कर्मेल डोंगरावर माझ्या पुढे जमीव. लोकांना एलीयाने प्रश्न केला,'' तुम्ही दोहो मतांमध्ये कोठवर लटपटाल? परमेश्वर हा देव असला तर त्याच्या भजनी लागा; बाल हा देव असला तर त्याच्या भजनी लागा. तो पुढे लोकांस म्हणाला, ''आम्हांस दोन गोऱ्हे द्यावे, त्यांनी आपल्यासाठी वाटेल तो गोऱ्हा घ्यावा त्याचे त्यांनी कापून तुकडे करावे आणि ते इंधनावर रचावे, पण त्यांस अग्नि लावू नये, मग मीहि दुसऱ्या गोऱ्ह्याचे तसेच करुन ते इंधनावर रचीन व त्याला अग्नि लावणार नाही. तुम्ही आपल्या देवाचे नांव घ्या आणि मी परमेश्वराचे नाम घेतो, जो देव अग्नीच्या द्वारे उत्तर देईल तोच देव ठरावा. सर्व लोक म्हणाले, ''ठीक आहे.'' एलीया बालाच्या संदेष्ट्यांस म्हणाला प्रथम तुम्ही वाटेल तो गोऱ्हा निवडून सिद्ध करा, कारण तुम्ही पुष्कळ जण आहां; तुम्ही आपल्या देवाचे नाम घ्या, पण अग्नी मात्र लावूं नका.'' मग त्यास दिलेला गोऱ्हा त्यांनी सिद्ध केला आणि सकाळपासून थेट दोन प्रहरापर्यंत ते बालाचें नांव घेत व हे बाला, आमचे ऐक, असे म्हणत राहिले, पण कांही वाणी झाली नाही की कोणी उत्तर दिले नाही. ते आपल्या रिवाजाप्रमाणे सुऱ्यांनी व भाल्यांनी आपणांस घाव करून घेऊ लागले, एवढे की ते रक्तबंबाळ झाले. त्यांनी पराभव स्विकारला.

एलीयाने नंतर परमेश्वराच्या नामानें वेदी बांधली; दोन मापे बी राहिल एवढी खलगी त्याने वेदीसभोवार खणिली. त्याने वेदीवर इंधने ठेविली आणि गोऱ्हा कापून व तुकडे करून ते इंधनावर रचिले. मग तो म्हणाला, चार घागरी पाणी भरून होमबलीवर व इंधनावर ओता. तो पुनः म्हणाला, दुसऱ्यांदा तसेच करा; तेव्हां लोकांनी दुसऱ्यांदा तसेच केले. तो म्हणाला, तिसऱ्यांदा तसेच करा; आणि त्यांनी तिसऱ्यांदा तसेच केले. पाणी वेदीवरून सभोवार वाहिलें, आणि ती खळगीहि पाण्यानें रली.

संध्याकाळच्या यज्ञसमयी एलीया संदेष्टापुढें होऊन म्हणाला, ''**हे परमेश्वरा, अब्राहाम व इसहाक व इस्राएल यांच्या देवा, इस्राएलमध्ये तुच देव आहेस, मी तुझा सेवक आहे आणि मी ह्या गोष्टी तुझ्याच आज्ञेने केल्या आहेत.**''

तेव्हा परमेश्वरापासून अग्नि उतरला आणि त्याने होमवली, इंधने, धोंडे आणि माती ही भस्म करून टाकिली आणि त्या खळगीतलें पाणी चाटिले. हे पाहून सर्व लोक पालथे पडून म्हणाले, परमेश्वर हाच देव! परमेश्वर हाच देव! ''एलीयानें स्वर्गातून अग्नि आणून द्विबुद्धिच्या इस्राएल लोकांना सिद्ध केले कि परमेश्वर हाच देव आहे.''

आपल्याला या दिवसांत असे देवाचे दास आणि संदेष्टे क्वचितच पहावयास मिळतात. हल्ली जेव्हा चमत्कार घडतात, किंवा भविष्यवाणी पूर्ण होते, कांही देवाचे दास अशा कुटुंबांना भेट देवून, ते त्यांच्या प्रार्थनेमुळे घडून आले असा दावा करताना पहावयास मिळतात ना? संबंधीत देवाच्या दासाची कॅमेरा टिम त्यांच्या सर्व प्रसार माध्यमांच्या उपकरणासह अशा कुटुंबांना भेट देवून त्याच्या सभोवती गोळा होतात आणि त्याला व्यापाराचे स्वरूप देतात हे खरे आहे नाहि कां? अशा लोकांना पाठींबा देणाऱ्यांच्या संख्येत देखील वाढ होत आहे. देवच काय तो चमत्कार करतो. येशूने म्हटले, ''तुम्हांस फुकट मिळाले आहे, फुकट द्या.'' (मत्तय १०:८)

## II अलीशा संदेष्टा :

परमेश्वराने म्हटल्याप्रमाणे, एलीया संदेष्टा अलीशा संदेष्ट्याला भेटला. तो बैलांची बारा जातें चालवून शेत नांगरीत असे, आणि तो स्वतः बाराव्या जोताबरोबर होता. त्याच्या जवळ जाऊन एलीयाने आपला झगा त्याजवर टाकिला. (१ राजे १९:१९) परमेश्वरानें एलीयाला जीवंत असे स्वर्गात घेतल्यानंतर अलीशा यहोराम, येहू आणि योआज या

राजांच्या कारकीर्दीत मोठे चमत्कार करणारा संदेष्टा बनला.

एलीयाच्याद्वारे अलीशाला जे प्रशिक्षण मिळाले ते अतिशय कठीण असे होते. जो कोणी स्वेच्छेने स्वत:स कठीण परिश्रम आणि प्रशिक्षणात सामील होतो - सहभाग घेतो तो देवाचा एक उत्तम सेवक बनतो. जे कठीण परिश्रमास योग्य प्रशिक्षणास आणि कार्यास नकार देतात अशांच्या द्वारे कोणत्याहि महान गोष्टी घडू शकत नाहित. रविवारच्या उपासनेत सहभागी होण्याद्वारे आपण देवासाठी फार मोठा त्याग करीत आहोत अशी स्वत:ची समजुत करून घेणारे देवाचे महान सेवक बनू शकत नाहीत.

### १) अलीशा, जो त्याला पाचारण केलेल्या व्यक्तिशी एकरुप झाला :

एलीया आणि अलीशा गिलगालमध्ये सेवा करीत असताना एलीया अलीशास म्हणाला, ''परमेश्वर मला बेथेल येथे पाठवीत आहे; तर तूं एथेच थांब.'' परंतु अलीशा त्याला सोडण्यास तयार नव्हता. तो म्हणाला ''परमेश्वराच्या व आपल्या जीविताची शपथ मी आपल्याला कधी सोडावयाचा नाही.'' आणि तो त्याचा पुढेही एलीया जेथे कोठे गेला त्याच्या मागे मागे गेला.

तेव्हा ते दोघे बेथेलास गेले, तेथुन ते यरीहोस गेले, यरोहावरून ते यार्देन येथे गेले. या सर्व ठीकाणी एलीयाने त्याचा सहकारी अलीशा यास एकटे सोडण्याचा प्रयत्न केला. परंतु अलीशा मात्र त्याच्या पुढाऱ्यास थोडा वेळ देखील सोडावयास तयार नव्हता, परंतु त्याच्या मागे-मागे जात राहिला.

यार्देन येथे देखील ''मला यार्देन नदीपलीकडे जावयाचे आहे,'' असे बोलून एलीया त्याला सोडू इच्छित होता. अलीशाने आग्रह धरला, की त्याच्याबरोबर त्याला देखील यार्देन पार करू द्यावे. यार्देन पार करण्या अगोदर एलीयाने आपला झगा काढून त्याची वळकटी करून ती पाण्यावर मारिली, तेव्हां पाणी दुभंग झाले व ते दोघे कोरड्या भूमीवरून पलीकडे गेले. ते पलीकडे गेल्यावर एलीया अलीशास म्हणाला की ''लवकरच तो पृथ्वी सोडणार आहे. मला तुजपासून नेण्यात येण्यापूर्वी मी तुजसाठी काय करू ते मला सांग.'' अलीशा म्हणाला, आपल्या ठायी असलेल्या आत्म्याचा दुप्पट वाटा माझ्या ठायी यावा.'' एलीया म्हणाला तूं दुर्घट गोष्ट मागतोस, पण मला तुजपासून घेऊन जातील त्या समयी मी तुला दिसलो तर तूं मागतोस ते तुला प्राप्त होईल, न दिसलो तर प्राप्त होणार नाही.'' आणि अलीशा एलीयाकडे काळजीपूर्वक पाहात असताना एकाएकी एक अग्निरथ आणि अग्निवारू त्याला दृष्टिस पडले आणि एलीया त्या अग्निरथांतून स्वर्गास गेला. हे पाहून अलीशा मोठ्याने म्हणाला, माझ्या बापा! माझ्या बापा! इस्राएलाच्या रथांनो! इस्राएलाच्या राऊतांनों! एलीयाचा झगा तो त्याच्या अंगावरून खाली पडला होता तो त्याने उचलून घेतला आणि तो परत जाऊन यार्देनतीरी उभा राहिला (२ राजे २:१२-१३).

### २) अलीशा कधीच नाऊमेद झाला नाही :

अलीशाला जरी समजले होते कि त्याच्या पुढाऱ्याच्या शब्दांद्वारे आणि कार्यक्रमाद्वारे त्याची पुष्कळदा परिक्षा घेण्यात येत होती, तो कधीच नाऊमेद झाला नाही.

**दु:ख सहन करणाऱ्यांना मदत करण्यास देव समर्थ आहे. ते कधीच लज्जीत होणार नाहीत.** तुम्ही कदाचित विचार कराल, तुमच्या प्रार्थना अनुत्तरीत आहेत; दिवस आणि पैसे व्यर्थ खर्च केले गेलेत. तुम्ही जरी देवाची सेवा केली, ते सर्व काही अपयशी ठरले. तुम्ही ''कदाचित असा प्रश्न देखील विचारल,'' खरोखरीच देव अस्तीत्वात आहे?''

आता तुम्ही नाऊमेद झालेला आहात काय? नाऊमेद होऊ नका; धैर्यवान व्हा. देव तुमच्या जीवनात निश्चितच एक अनेपेक्षित चमत्कार घडविल! अलीशाप्रमाणे स्वत:स बदला. तसे केल्यास निश्चितच परिस्थितीत बदल घडेल! समय बदलेल. आपला देव बदलत नाही.

एलीयाला देवाने वर नेताना जरी अलीशा मोठ्याने म्हणाला, ''माझ्या बापा! माझ्या बापा!! 'तरी त्याने त्याचा विश्वास गमावला नाही. आशा सोडली नाही. त्याने त्याच्या डोक्यावर झालेल्या अभिषेकाकडे आणि त्याच्या पाचारणाकडे दुर्लक्ष केले नाही. त्याने केवळ स्वर्गाकडे वर पाहिले आणि आक्रोश केला.

प्रिय वाचका, अलीशाने त्याच्या अंगावर पडलेला झगा उचलून घेतला व पाण्यावर मारीला, आणि पाणी दुभंग झाले. व तो

(...पान ६ वर)


# नहेम्याह बाइबल कॉलेज
## रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।

माध्यमः हिन्दी

*सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार* - ATA

**सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 53 वर्षो से सेवारत वरिष्ठ पासवान**

सर्टिफिकेट इन थियोलॉजी – 1 साल

डिप्लोमा ऑफ थियोलॉजी – 2 साल

**योग्यता 10 वी या अधिक**

**जल्दी करें!**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

★ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ★

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**प्रार्थना स्तुति आणि मुद्दे १९ जुलै २०२२ ते १८ ऑगस्ट २०२२ पर्यंत**

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## ✝ स्तुति करिता मुद्दे

**१९ जुलै** : देवाने आम्हाला त्याच्या कृपेद्वारे शुभवर्तमान न पोहचलेल्या ठिकाणांपर्यंत नेण्यास मदत केली.

**२० जुलै** : आम्हाला प्रार्थना आणि पाठबळ देणाऱ्या सर्वांकरीता स्तुति करु या.

**२१ जुलै** : आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल, नहेम्या बायबल कॉलेज** आणि पत्रव्यवहारा द्वारे करण्यात येत असलेल्या **थियॉलॉजीकल** अभ्यासक्रमाबद्दल देवाची स्तुती करु या.

**२२ जुलै** : आमचे पास्टर एस्. सॅम सेल्वाराज आणि त्यांच्या कुटुंबावर असलेल्या देवाच्या विपुल आशीर्वादाबद्दल स्तुती करु या.

**२३ जुलै** : आमच्या सर्व सहसंपादकांबद्दल आणि त्यांच्या कुटुंबियांबद्दल देवाची स्तुती करु या.

**२४ जुलै** : अधिक विश्वासणाऱ्यांची भर घालून देवाने आमच्या मुख्य व मंडळ्या आशीर्वादीत केल्या.

**२५ जुलै** : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन आणि महान आज्ञापालनातील भागीदार व त्याच्या कुटुंबियांकरीता स्तुती करु या.

**२६ जुलै** : आमच्या सर्व कर्मचाऱ्यांवर आणि त्यांच्या कुटुंबियांवर देवाने वर्षविलेल्या आशीर्वादाबद्दल त्यांची स्तुती करु या.

**२७ जुलै** : आमच्या देशाला देवाने सुरक्षित ठेविल्या बद्दल स्तुती करु या.

**२८ जुलै** : ३ जून २०२२ रोजी पार पडलेल्या आमच्या नहेम्या बायबल कॉलेजचा दिक्षांत समारंभ देवाने आशीर्वादीत केल्याबद्दल स्तुती करु या.

**२९ जुलै** : आमच्या मंडळीत अभिषेकासहित नवीन विश्वासणाऱ्यांना आशीर्वादीत केल्याबद्दल देवाची स्तुती करु या.

**३० जुलै** : आमच्या नहेम्या बायबल कॉलेजच्या निवासी आणि सायंकालीन अभ्यासक्रमांसाठी देवाने विद्यार्थी पुरविल्याबद्दल स्तुती करु या.

**०१ ऑगस्ट** : सर्व राज्य समन्वयकांबद्दल आणि त्यांच्या सहभागीतेबद्दल स्तुती करु या.

**०२ ऑगस्ट** : मिशन क्षेत्रांतील सेवकांच्या समर्पितपणाबद्दल स्तुती करु या.

**०३ ऑगस्ट** : देव आमचे वरिष्ठ पास्टर एस्. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबाचे सर्व दुष्ट शक्तिपासून रक्षण करीत आहे. त्याबद्दल स्तुती करु या.

## ✝ प्रार्थने करीता मुद्दे

**०४ ऑगस्ट** : आमच्या इंग्रजी मासिकाचे सहसंपादक **बंधु मॅनुएल एम्. पॉलराज** यांनी दिनांक २५ मे २०२२ रोजी या इहलोकीची यात्रा संपवून गौरवात प्रवेश केला. कृपया दु:खीत मित्र, कुटुंबिय आणि नातेवाईकांसाठी प्रार्थना करा.

**०५ ऑगस्ट** : आम्हाला शुभवर्तमान न पोहचलेल्या ठीकाणांमध्ये ते पोहचविणे शक्य व्हावे याकरीता प्रार्थना करा.

**०६ ऑगस्ट** : सर्व धर्मियांनमध्ये ऐक्य प्रस्थापित होण्यासाठी प्रार्थना करण्याची जबाबदारी स्विकारण्यासाठी प्रार्थना करा.

**०७ ऑगस्ट** : देवाबद्दल सर्व राष्ट्रांमध्ये अखंडत्वाची भावना उत्पन्न व्हावी यासाठी प्रार्थना करा.

**०८ ऑगस्ट** : या पृथ्वीतलावर त्याचे राज्य उभारण्याकरीता अधीकाधीक दृष्टिकोन देवाने आपल्याला द्यावा यासाठी प्रार्थना करा.

**०९ ऑगस्ट** : आपल्या देशांतील ऐक्यासाठी आणि सर्व प्रकारे प्रगती व्हावी यासाठी

**१० ऑगस्ट** : आज आम्ही सेवेच्या ५४व्या वर्षात पदार्पण केले आहे, पुढील वाटचालीकरीता प्रार्थना करा.

**११ ऑगस्ट** : रशिया आणि युक्रेन या दोन देशांमधील युद्ध थांबावे यासाठी करीता प्रार्थना करा.

**१२ ऑगस्ट** : जागतीक शांततेकरीता प्रार्थना करा.

**१३ ऑगस्ट** : आमच्या वरिष्ट पाळकांना त्यांचे आत्मचरित्र लिहिण्यात यशस्वी व्हावेत यासाठी प्रार्थना करा.

**१४ ऑगस्ट** : स्त्रीया आणि लेकरांवरील अत्याचार पूर्णपणे नष्ट व्हावे यासाठी प्रार्थना करा.

**१५ ऑगस्ट** : देवाने आमच्या सर्व समन्वयकांना आणि पाळकांना नवीन शक्ति द्यावी.

**१६ ऑगस्ट** : सर्व ख्रिस्ती संस्थांकरीता प्रार्थना करु या.

**१७ ऑगस्ट** : मिशन क्षेत्रांतील आमच्या सर्व सेवकांकरीता प्रार्थना करा.

**१८ ऑगस्ट** : देवाने आमच्या वरीष्ट पाळक एस्. सॅम. सेल्वाराज यांच्या सेवे संदर्भातील सर्व योजना आशीर्वादीत कराव्यात याकरीता प्रार्थना करा.

(...पान ४ वरुन)

पलीकडे गेला. तुम्ही तुमच्या योग्यतेवर किंवा कमीपणाचा विचार करू नका. बायबल सांगते अलीशाने अधीक चमत्कार केले.

### ३) देव प्रत्येक छोट्या प्रार्थनेस उत्तर देतो :

आपल्या गरजांकरीता आपण देवाला प्रार्थना करितो तेव्हा, त्याने आपल्याला हवे तसे उत्तर द्यावे याची गरज नाही. उदा. तुम्ही बँकेने तुम्हाला कर्ज मंजूर करावे यासाठी उपास करून प्रार्थना करीत असाल. देव कदाचीत ते कर्ज मिळावे म्हणून मदत करणार नाही; परंतु अगदी आश्चर्यकारक रित्या तो दुसऱ्या कोणत्या तरी मार्गाने तुमची आर्थीक गरज भागविल.

माझे चेन्नईमध्ये डॉ. रविंदर बोस नावाचे एक शल्य चिकीत्सक मित्र आहेत. ते धार्मिक आणि पैशांवर प्रेम नसलेली व्यक्ति आहेत. ते देवाचे सेवक देखील आहेत. एकदा एका डॉक्टरांनी माझ्या एका मित्राला मुळव्याध झाल्याचे आणि त्यावर शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्याचे सांगितले. तो मित्र माझ्याकडे मी प्रार्थना करावी म्हणून आला. मी त्याच्याकरिता प्रार्थना केली व तो अतीशय गरीब असल्यामुळे मी त्याला डॉक्टर रविंदर बोस या मित्राकडे घेऊन गेलो.

रुग्णाची तपासणी करण्या अगोदर डॉक्टरानी छोटिशी प्रार्थना केली. त्यानंतर त्यांनी त्या रुग्णाला म्हटले, शस्त्रक्रिया करण्याची गरज आहे, पुष्कळ पाणी प्या, पुष्कळ हिरव्या भाज्या आणि केळी खा. एका आठवड्यानंतर या. माझी खात्री आहे तुम्ही बरे व्हाल. ''आम्ही घरी जात असताना मला त्या रुग्णाच्या चेहरा थोडासा त्रस्त असल्यासारखा दिसला. मी त्याला ''तूं कां काळजी करीत आहेस''? असे विचारल्यावर त्याने उत्तरादाखल म्हटले. ''शस्त्रक्रिया न झाल्याबद्दल मला काळजी वाटते. कमी खर्चात शस्त्रक्रिया व्हावी अशी त्याची अपेक्षा होती!'' कसेहि असो, त्याने डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे सर्व काही केले.

परंतु असे घडले कि शस्त्रक्रिया केल्याशिवाय तो बरा झाला! त्याची समस्या ही होती कि, तो शस्त्रक्रिया करून घेण्यास तयार असताना, आता शस्त्रक्रिया झाली नाही!

कांही वेळा आपण प्रार्थना करतो आणि आपल्या मनाला वाटते तशा प्रकारे उत्तराची अपेक्षा करित असतो - परंतु देव त्याच्या स्वतःच्या शहाणपणानुसार आणि सामर्थ्यानुसार कार्य करीत असतो. आपण तो चमत्कार स्विकारण्याची तयारी ठेवली पाहिजे.

अलीशाला देखील वाटले असेल, एलीयाच्या शक्तीचा दुप्पट वाटा मिळण्या ऐवजी, मला केवळ त्याचा झगाच मिळाला. परंतु अलीशा धार्मिक मनुष्य असल्यामुळे, त्याने तो झगा मनःपूर्वक स्विकारला.

देवाच्या प्रिय लेकरा, तुझ्या प्रार्थनेच्या उत्तराबद्दल देवाच्या उत्तराबद्दल तुझी मनोवृत्ती कशी आहे?

### III गेहजी :

अरामाच्या राजाचा सेनापति नामान हा कोडी होता. (२ राजे ५:१) इस्त्राएल देशातून कैद करून आणलेली एक लहान मुलगी त्याच्या पत्नीच्या सेवेस राहिली. ती आपल्या धनिणीस म्हणाली, नामानास अलीशाकडे नेले तर त्याचे कोड बरे होईल. त्यामुळे नामान अलीशाकडे आला. अलीशाच्या दारी जाऊन उभा राहिला, तेव्हा त्याला अलीशाद्वारे त्याला जाऊन सात वेळा यार्देनेत स्नान करण्यास सांगिण्यात आले. हे ऐकून नामान रागावून चालता झाला; तो म्हणाला ''पाहा, मला वाटले होते, तो स्वतः मजकडे बाहेर येईल व उभा राहून आपला देव परमेश्वर याचे नाम घेईल. रोगाच्या ठिकाणी हाथ फिरवून माझे कोड बरे करील. दिमिष्कातल्या नद्या अथाना व परपर या इस्त्राएलांतल्या सर्व जलाशयांपेक्षा उत्तम नाहित काय? त्यात स्नान करून मला शुद्ध होता यावयाचें नाही काय?'' परंतु त्याचे सेवक त्याजकडे येऊन त्याला समजावून म्हणाले, बाबा, संदेष्ट्यानें आपल्याला काही अवघड काम सांगितले असते तर आपण केले नसते काय? तर स्नान करुन शुद्ध व्हा, एव्हढेच त्याने आपल्याला सांगितले, ते आपण कां करु नये?''

हे ऐकून, त्याने देवाच्या माणसाया सांगण्याप्रमाणे यार्देनेत सात वेळा बुचकळ्या मारिल्या तेव्हां त्याचे शरीर लहान मुलाच्या शरीरासारखे होऊन तो शुद्ध झाला. आणि तो बरोबरची सर्व मंडळी घेऊन देवाच्या माणसाकडे परत गेला व त्याच्या समोर उभा राहून म्हणाला, अखिल पृथ्वीत इस्त्राएलाबाहेर देव नाहि हे मला आता कळून आले आहे


## नहेम्या बायबल सायं कॉलेज
### चेपोक आणि संतोषपूरम, चेन्नई

माध्यम : तमिळ

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**सर्टिफिकेट इन थियॉलॉजी : कालावधी एक वर्ष**

**डिप्लोमा इन थियॉलॉजी : कालावधी दोन वर्षे**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

तर आता आपल्या सेवकाचा नजराणा स्वीकारावा. परंतु अलीशा म्हणाला, **''ज्या परमेश्वराच्या हुजुरास मी असतो त्याच्या जीविताची शपथ, मी काही एक घेणार नाही.''** **त्याने त्यास पुष्कळ आग्रह केला तरी तो काही घेईना.** (२ राजे ५.११-१६).

अलीशाचा चाकर गेहजी हे सर्व पाहात होता आणि त्याने विचार केला की, माझ्या धन्यानें नामानाकडून नजराणा स्विकारला नाही. मी त्याच्यामागे धावत जाऊन त्याजपासून काही तरी घेतोच. मग गेहजी नामानाच्या मागून धावत गेला. नामानानें पाहिले तेव्हा त्याने आपल्या रथावरून उतरून त्यास सामोरे जाऊन विचारीले, ''सर्व काही ठीक आहे नां?'' गेहजी म्हणाला सर्व काही ठीक आहे. माझ्या धन्यानें आपल्याला सांगावयास पाठविले आहे की पाहा, एफ्राइमाच्या डोंगरी प्रदेशांतून संदेष्ट्याचे दोन शिष्य माझ्या एथे नुकतेच आले आहेत त्यांच्यासाठी एक किक्कार चांदी व दोन पोषाक द्या.'' नामान म्हणाला, कृपा करून दोन किक्कार घे. त्याने आग्रह करून दोन किक्कार चांदीच्या दोन थैल्या बांधून दोन पोषाकांसह आपल्या दोन सेवकांच्या खांद्यावर ठेविल्या. हे सर्व घेऊन ते त्याच्यापुढे चालले. गेहजीनें त्या वस्तु त्यांच्या हातून घेऊन आपल्या घरी ठेवून दिल्या आणि त्या मनुष्यांस जा म्हणून सांगितले आणि ते निघून गेले.

तो आंत जाऊन आपल्या धन्यापुढे उभा राहिला. आलीशा त्यास म्हणाला, ''गेहजी तूं कोठून आलास'' त्याने म्हटले ''आपला दास कोठेही गेला नव्हता.'' अलीशाला त्याच्या दैवी शहाणपणा द्वारे त्याच्या चाकराने काय केले ते समजले होते. त्याला खुप वाईट वाटले, व त्याने गेहजीला म्हटले, **''तो पुरुष तुला भेटावयासाठी आपल्या रथावरून उतरुन मागे फिरला तेव्हा माझे लक्ष तिकडे गेले नव्हते काय? चांदी, वस्त्रे, जैतुनाचें बाग, द्राक्षाचे मळे, शेरडी-मेंढरे, गुरेढोरे, दासदासी घेण्याचा हा समय आहे काय? तर नामानाचें कोड तुला व तुझ्या संतानाला निरंतर लागून राहील. तेव्हां तो बर्फासारखा पांढरा कोडी होऊन त्याच्यापुढून चालता झाला.''** (२ राजे ५:२०-२७). गेहजी, जो देवाचा सेवक याने त्याचे नांव देवाच्या सेवकांच्या यादितून काढून टाकीले होते. त्याचे संतान देखील शापग्रस्त झाले.

तुमच्या पुढे कोणचा आदर्श आहे? **तुम्ही जर मला विचाराल, तर मी म्हणेन मला अलीशा सारखे व्हावयाचे आहे. मला अलीशाच्या डोक्यावर उतरलेला अभिषेक माझ्या डोक्यावर उतरावा अशी उत्कट इच्छा आहे; त्यामुळे मला दुप्पट आशीर्वाद प्राप्त होईल व मी या जगात विजयी जीवन जगू शकेन.**

कृपया थोडा वेळ गंभीरपणे विचार करा! तुम्हाला अलीशाप्रमाणे पाचारण झाले आहे कां? अलीशाप्रमाणे जरी तुम्हाला पाचारण करण्यात आले असेल, तुम्ही अजुनही तुमच्या शारिरीक आणि आत्मिक दैनंदीन समस्यांशी झगडत आहात? काही चांगले काम केल्याच्या किंवा सेवेच्या बदल्यात पैसे गोळा करीत तुम्ही गेहजी सारखे जीवन जगत आहात का?

आजच्या काही देवाच्या सेवकांच्या बॅगेत शुभवर्तमान हस्तपत्रिका किंवा बायबल नसतील; तर त्याऐवजी अंदाज पत्रकाच्या प्रति, त्यांच्या आवडत्या प्रकल्पा संबंधीत कागदपत्र निश्चितच असतील काहीजण तर इतके हुशार आहेत की त्यांचा तपशील मुखोगत् असतो. आजचे अनेक देवाचे सेवक पैसे उकळण्यासाठी योजना शोधण्यात तरबेज आहेत. त्यांच्याकडे पैसे मिळविण्याकरीता काही ''पवित्र कारण'' असते.

देवासाठी कार्य करणाऱ्यांना जेव्हा पैशांची गरज भासते, ते जाहिर करून सांगत असतात,

(...पान ९ वर)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. **'सर्टफिकेट इन मिनिस्ट्री'** प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## TAX EXEMPTION

Donations by any individual or organization from India to **Echo of His Call Educational Trust** are eligible for Income Tax exemption under Section 80G of the Income Tax Act. Official receipts will be issued for this purpose. Please make your Demand Drafts / Cheques / M.O. for such donations in favour of **Echo of His Call Educational Trust** and send to us.

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : | **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**"नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !" (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

### एका पेन्सिल चटईची जुनी कथा

"मुलाच्या स्थितीस अनुरूप असे शिक्षण त्याला दे, म्हणजे वृद्धपणीहि तो त्यापासून परावृत्त होणार नाही." (नीतिसूत्रे २२:६)

गावातील एका शासकीय शाळेतील माझे ५वी इयत्तेचे शिक्षण पूर्ण झाल्या नंतर, मला हायस्कूल मध्ये प्रवेश मिळाला, जेथे मला प्रथमच इंग्रजी मुळाक्षरे शिकावयास मिळली. शाळेच्या पहिल्याच दिवशी, वर्गशिक्षकाने सर्व विद्यार्थ्यांना सुचना दिली की सर्वांनी उद्या सोबत **पेन्सिल आणि वही** आणावी. शाळेतून घरी आल्या बरोबर मी, माझे वडील बाहेर गावी गेलेले असल्यामुळे आईला माझी गरज सांगितली. तिला वही मिळविणे शक्य झाले परंतु माझ्याकरीता पेन्सिल विकत घेणे शक्य झाले नाही. आमच्या शेजारी राहाणाऱ्या नातेवाईकांद्वारे माझी गरज पुरविली जावी अशी तिची इच्छा नव्हती. त्यामुळे तिने मला तसे समजावून सांगितले व मी प्रभू येशू ख्रिस्ताकडे मला पेन्सिल मिळावी यासाठी प्रार्थना करण्यास सांगितले.

तिच्या शब्दांचे पालन करून, मी गुडघे टेकले व देवाला प्रार्थना केली की मला पेन्सिल मिळू दे आणि रात्री झोपी गेलो. देवाने मला सकाळपर्यंत पेन्सिल दिली नाहि. त्यामुळे मला पेन्सिली शिवाय शाळेत जावे लागले. वर्गातील इतर सर्व मुलांकडे त्यांच्या वापराकरीता पेन्सिल होत्या, केवळ मीच शिक्षकांची आज्ञा पाळू शकलो नव्हतो. त्यामुळे शिक्षिकामजवर संतुष्ट नव्हती. तिने मला म्हटले मी उद्या पेन्सिली शिवाय शाळेत येऊ नये.

मी घरी येऊन माझ्या शिक्षिकेच्या नाराजीबद्दल आईला सांगितले. ती केवळ मजकडे पाहून हसली व मला म्हणाली, आज देखील पेन्सिलीकरीता प्रार्थना करीत राहा. आणि मला आश्वासन दिले कि पेन्सिल येत आहे. मी काही घडत आहे असे पाहू शकलो नाही. दुसऱ्या दिवशी देखील मला रिकाम्या हातांनीच शाळेत जावे लागले. शिक्षिकेने मला विचारल्यावर मी प्रभु येशू ख्रिस्ताकडे पेन्सिली करीता प्रार्थना केली आहे, आणि पेन्सिल येण्याच्या मार्गावर आहे. असे तिला सांगितले शिक्षिका ते ऐकून चिडली व माझ्या आणि आईच्या प्रवृत्तीवर रागावली. ती म्हणाली उद्या मी पेन्सिली शिवाय शाळेत येऊ नये.

अतिशय दु:खाने मी ती बातमी आईला सांगितली. तिने मला प्रभू येशूने माझी **पेन्सिलसाठी** केलेली प्रार्थना ऐकल्याबद्दल आभार मानण्यास सांगितले. मी मध्यरात्रीपर्यंत प्रभुचे आभार मानीत राहीलो. पेन्सिल न घेता उद्या शाळेत जावे लागले तर मिळणाऱ्या शिक्षेबद्दल विचार करू लागलो, त्यामुळे रात्रभर मला झोप लागली नाही.

मला आश्चर्य वाटले, अचानक मध्यरात्री कोणीतरी दार ठोकीत असल्याचे मला ऐकू आले. माझी आई मला म्हणाली, घरात कोणी वरिष्ठ माणूस नसल्याचे माहित असल्यामुळे कदाचीत चोरच दार ठोकीत असणार, तूं गप्प राहा आणि खाटेखाली जाऊन झोप.

त्यानंतर आम्हाला, आईच्या नांवाने हाक मारीत असलेले ऐकू आले. तो आवाज दुसऱ्या कोणाचा नव्हता तर माझे मामा सेलवामनी जे पलयामकोही या आमच्या गावापासून ७० कि.मी. दूर असलेल्या गावात पोलीस अधीकारी होते. त्यांचा होता. आम्ही आनंदीत होऊन दरवाजा उघडला. त्यांनी माझ्या करीता नेहमीप्रमाणेच बिस्कीटे, मिठाई, कपडे अशा पुष्कळ गोष्टी भेट म्हणून आणिल्या होत्या. मी जेव्हा एक विशिष्ट बॅग उघडली, मला त्यांत एक डबा आढळला. मी कुतुहलाने तो डबा उघडला तेव्हा त्यांत मला अतिशय महाग अशा पेन्सिलीनी डबा भरलेला आहे असे दिसले. त्या 'नटराज' पेन्सिली होत्या. (ज्या त्या काळात अतिशय महाग अशा होत्या.) त्या डब्यात एकूण २४ पेन्सिली होत्या.

येशू ख्रिस्ताने केवळ माझी प्रार्थना ऐकलीच नाही तर उत्तर देखील दिले असे म्हणून त्या मध्यरात्री मी आनंदाने उड्या मारू लागलो. अतिशय आनंदीत झाल्यामुळे रात्रभर झोपलो नाही.

दुसऱ्या दिवशी मी या २४ पेन्सिलींचा डबा घेऊन अतिशय आनंदाने शाळेत गेलो. इतर मुले केवळ एक पेन्सिल घेऊन आले होते. परंतु माझ्याकडे २४ पेन्सिली होत्या. शिक्षिका रागीट चेहरा करून माझ्याकडे आली आणि हे कसे घडले याविषयी चौकशी करू लागली. मी तीला उत्तर दिले, जी पेन्सिल काल येण्याच्या मार्गावर होती ती आज अद्भूत रितीने माझ्या हातात मिळाली. तिने अतिशय आनंदाने माझी पाठ थोपटली आणि सर्व विद्यार्थ्यांना जाहिर केले कि एक जीवंत देव आहे ज्याचे नांव **येशू ख्रिस्त** आहे.

प्रिय वाचका, हि घटना मी सात वर्षांचा असताना घडली, तरी देखील तो अनुभव आज देखील माझ्या मनात ताजा आहे. मला पेन्सिल ज्याने पुरविली तो देव आज देखील जीवीत आहे. **तो काल, आज हा सर्व काळ सारखाच आहे.** (इब्री १३:८)

त्यामुळे आज देखील **माझ्या खोलीत एक चटई ठेवलेली आहे, जीला मी 'पेन्सिलची चटई' म्हणतो. मी दररोज पहाटे त्या चटईवर जातो आणि माझ्या दिवसभरातील व्यस्त समयांतून तीन वेळा माझ्या गरजा त्याच येशू ख्रिस्ताला सादर करीतो. आजपर्यंत या पेन्सिल चटई पासून मला अगदी सुई पासून ते अनेक मिनी बसेस, इमारती इत्यादी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे मी या अनुमाना पर्यंत आलो आहे, ''पवित्र बायबल हातात असलेले हात आणी प्रार्थने करीता टेकण्यात येणारे गुडघे कदापी अपयशी ठरणार नाही.''**

त्यामुळे आजवरच्या माझ्या ५३ वर्षांचा सेवेत, मी कोणताहि नीधी उभारल्याची योजना तयार केली नाही किंवा निधी गोळा करण्याकरीता किंवा आमच्या विविध सेवा कार्यातील गरजांकरीता दारो-दारी गेलो नाही. मला माझ्या 'पेन्सिल चटई'वरून मागितलेल्या सर्व गरजाकरीता लागणारा निधी उत्तरादाखल माझ्या देवाकडूनच प्राप्त झाला.

''**मला सामर्थ्य देणाऱ्याच्या ठायी मी सर्व काही करावयास शक्तिमान आहे.**'' (फिलिपो ३:१३).

************

पान ७ वरुन

''मला तुमचे पैसे द्या. मी अश्रु ढाळून तुमच्या करीता प्रार्थना करीन. म्हणजे तुम्ही नशीबवान असणार.'' काही म्हणतात, ''देवाला आमच्या सेवाकार्यांसाठी प्रत्येकी १००० रुपये देणारे ७५० लोक हवे आहेत.'' काही म्हणतात, देवाने मला दर्शन देवून सांगितले, की सेवानिवृत्त झालेल्या ज्या व्यक्तिना जी मोठी रक्कम मिळाली ती सर्व त्यांनी आमच्या सेवेकरीता द्यावी; आम्ही ५ वर्षांनी ती पूर्ण रक्कम परत करू.''

येशूने त्याच्या शिष्यांना लोकांना फसविण्यास शिकविले नाही. उलट त्याने त्यांना म्हटले, ''... **तूं जाऊन समुद्रात गळ टाक, आणि पहिल्यानें वर येईल तो मासा धरून त्याचे तोंड उघड; म्हणजे तुला दोन रुपयांचे नाणे सापडेल, ते घेऊन माझ्याबद्दल व तुझ्याबद्दल त्यांस दे.**'' (मत्तय १७;२७). काही देवाची लेकरे अयोग्य मार्गाने पैसे मिळवित होते आणि त्याची त्यांना चटक लागली. काहींची त्यांतून देवाच्या कार्याकरिता देण्याची तयारी देखील होती. परंतु देव अशा अयोग्य मार्गाने मिळविलेल्या पैशांकरीता नाही. देवाच्या प्रिय सेवका तुझे सर्व कार्य सावधतेने कर!

आपण जेव्हा आपले सेवा कार्य प्रामाणिकपणे करीतो, तेंव्हा आपला खर्च कसा पुरविला जाईल या बद्दल विचार करण्याची गरज नाही. पैशांकरीता युक्ती शोधण्याची गरज नाही. ज्या देवाने आपल्याला पाचारण केले तो विश्वसनिय आहे. ती त्याच्या लेकराला कदापी खाली पडू देणार नाही. त्याच्या कोणत्याहि सेवा कार्याकडे ती दुर्लक्ष करणार नाही. परंतु आपल्या कार्या मागील उद्दीष्ट मात्र निश्चितच पाहाणार.

**देवाच्या प्रिय लेकरांनो, तुम्ही तुमच्या मनाप्रमाणे वागत आला आहात कां? तुम्ही, काम छोटे असो किंवा मोठे एलीयाप्रमाणे देव इच्छितो त्यानुसार पवित्र जीवन जगून स्वर्गात पोहंचण्याची तुमची इच्छा आहे कां?**

**किंवा**

**तुम्ही अलीशासारखे आहा, परिश्रमपूर्वक प्रार्थना करीत विश्वासात खंबीर राहणारा, अशासाठी की तुमच्या पाचारणात खंबीर राहून आशीर्वादाचा दुप्पट वाटा मिळावा? तुम्ही अलीशाचे अनुसरण करून तुमच्या वैर्यांपेक्षा शहाणे आणि शिक्षकांपेक्षा अधीक समजदार आणि वयोवृद्धांपेक्षा अधिक हुशार होणार** (स्तोत्र ११९:९८-१००).

**किंवा**

**तुम्ही गेहजीप्रमाणे सेवेच्या नावा खाली इकडे तिकडे पैसे मिळविण्याकरिता धावत राहून तुमची सेवा गमावण्यास कारण ठरेल आणि तुमच्याकरीता व तुमच्या संताना करीता शाप ओढवून घेवू इच्छिता?**

तुमचा निर्णय हा तुमच्या इच्छेवर अवलंबून आहे. यावर तुमचे उत्तर काय आहे?

************

एको ऑफ हिज कॉल असामान्य अशा व्यक्तिला आणि त्याच्या प्रकाशनातील असामान्य लेखनाला मानवंदना देत आहे.



आम्ही अत्यंत दु:खीत अंत:करणाने कळवितो की

## बंधु मनुवेल एम्. पॉलराज

**एको ऑफ हिज कॉल,** इंग्रजी मासिकाचे सहसंपादक ज्यांनी आमच्या सोबत ४३ वर्षे सेवा केली, त्यांनी **बुधवार, २५ मे २०२२ रोजी सकाळी ६ वाजता** वयाच्या ७२व्या वर्षी या इहलोकीची यात्रा संपवून गौरवात प्रवेश केला. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी आणि नातवंडे राहिली आहेत. कृपया आम्हा सर्वांकरीता प्रार्थना करा.

**- पास्टर एस्. सॅम सेलवा राज**

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

**A good opportunity to get Echo of His Call monthly magazine at free of cost**

If you could send the addresses of your friends / relatives through post, letter, e.mail, WhatsApp or phone to us, we will dispatch **Echo of His Call** monthly magazine to them at free of cost.

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **S. Sam Selva Raj** |
| A/C No. | : | **1023 2934 679** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |
| SWIFT CODE | : | **SBI NIN BB 455** |

***2. Bank : ICICI Bank***

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Anna Salai, Chennai-6** |
| Name | : | **Echo of His Call** |
| A/C No. | : | **6038 0502 2319** |
| IFSC | : | **ICIC 000 6038** |

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **Echo of His Call Educational Trust** |
| A/C No. | : | **1023 2923 805** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-  आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th JULY 2022**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**